


MAHMAR 35909

# भारतीय आदिवासी साहित्य

## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक







: संपादक :

प्रा. वैजनाथ अनमुलवाड

अंक पहिला - वर्ष पहिले

जाने. ते मार्च २०११

स्त्री असो; अशा कितीतरी घटना-प्रसंगाच्या आधारे आदिवासींच्या शौर्याचा, निष्ठेचा, दानत्वाचा, कौशल्याचा, प्रेमाचा घात करुन स्वतःचे हित नागरी समाजाने करुन घेतल्याचे स्पष्ट करता येईल. आजही वरवर आदिवासींचे कल्याण दाखवून वेगवेगळ्या पद्धतीने राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक स्वार्थासाठी आदिवासींचा, त्यांच्या भावनांचा गैरवापर केला जात असल्याचे नाकारता येत नाही.

निष्कर्ष :

१) आदिवासी हेच भारतातील मूळनिवासी, आद्यवसाहतकार आहेत.

२) बहिर्वर्तुळातील आदिवासी हे मूळचे आंतवर्तळातीलच.

३) नागर ही मूळचे आदिवासी.

४) आत्मसंरक्षणाचे भय हे आदिवासीच्या मागासलेपणाचे महत्त्वाचे कारण.

५) पुराणकाळापासून नागर समाजाकडून स्वस्वार्थासाठी आदिवासींचा गैरवापर

६) आजही आदिवासींना सापत्न वागणूक. स्वार्थ सिद्धीसाठी प्रामुख्याने त्यांचा वापर.

●●●

## वाहरु सोनवणे, उषाकिरण आत्राम यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा एक शोध

**कु.सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार**

आदिवासी साहित्यामध्ये कविता हा वाड्मयप्रकार महत्वाचा ठरलेला आहे. आदिवासी कवींनी कवितेच्याद्वारे आपल्या भावना अधिक प्रमाणात व्यक्त केल्या, वेगळया जाणीवा आणि प्रेरणांतून जे साहित्य निर्माण होते, तेव्हा त्या साहित्य प्रवाहाची प्रगती व विकास घडतो. आदिवासी साहित्यिकांच्या साहित्याचा विचार करता या साहित्य प्रकाराचे दालन अधिक समृध्द झालेले दिसते.

आदिवासी स्त्रीयांवर आजपर्यंत जे अन्याय, अत्याचार, शोषण झालेले आहे, त्या अन्यायाविरूध्द लढण्याचे सामर्थ्य, समाजातल्या प्रत्येक स्त्रीकडे आहे. समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा हिनतेच्या, नकाराच्या भावना नष्ट करण्यासाठी, स्त्रीला निर्भिड बनविणे, स्त्रीला प्रेरीत करुन, अन्यायाविरुध्द लढण्याची भावना जागृती करण्यासाठी स्त्री साहित्याची, स्त्रीविषयी लिखाणाची अत्यंत गरज आहे.

आदिवासी स्त्रीयांच्या कविता या अन्यायाविरुध्द वाचा फोडायला लावणाऱ्या कविता आहेत. मानवेतर आधरित नवसमाज निर्माण करण्याचा ध्यास असणाऱ्या या आशावादी कविता आहेत. आपल्या समाजातील जनशक्तीचे वरदान स्त्री शक्तीला दिले आहे. समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य स्त्रीमध्ये आहे. म्हणून अदन्यान अंधश्रध्दा यामध्ये स्त्रीयांनी अडवता एक  नवे युग निर्माण करण्याची क्षमता स्त्रीमध्ये आहे. हे जाणले पाहिजे. पुरुष प्रधान व्यवस्था नष्ट होऊन, स्त्री - पुरुष समानतेची भावना, समाजमनात रुजायला हवी.

वेगळया जाणिवा आणि प्रेरणा यांची आत्मप्रकरटीकरणासाठी धडपड सुरु होते. तेव्हा साहित्य निर्माण होते. तिचा अविष्कार प्रथम कवितेतून होत असतो. आदिवासी जीवनातील अनुभव विश्वातील संवेदना ही कविता व्यक्त करते. श्रेष्ठ कवी वहारु सोनवणे यांची 'गोधड' आणि उषाकिरण आत्राम यांची 'लेखणीच्या तलवारी' या दोन कवितासंग्रहातून व्यक्त होणाऱ्या स्त्री प्रतिमांचे चित्रण प्रस्तुत शोधनिबंधातून शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

वाहरु सोनवणे यांच्या कवितेतील आदिवासी स्त्रीयांचे चित्रण -

वाहरु सोनवणे हे मराठी व भिलोरी भाषेचे श्रेष्ठ कवी आहेत. गोधड संग्रहात ५४ कविता समाविष्ट आहेत. वाहरु सोनवणे हे आदिवासी एकता परिषदेचे सक्रीय कार्यकर्ते आहेत. या कविता संग्रहातील कविता मधून आदिवासींचे दारिद्रय लाचारी उच्चवर्गीयांकडून त्यांच्यावर केले जाणरे अत्याचार, पिळवणूक, विषम समाजव्यवस्था, माणुसकी जपणारी आदिवासी संस्कृती या गोष्टीचे दर्शन घडते.

आदिवासी स्त्रीयादेखील भारतीय समाजव्यवस्थे उपेक्षित राहिल्या या पुरुषप्रधान व्यवस्थेने त्यांनाही गुलाम बनविले. त्यांच्यावर अत्याचार केले. त्यांच्या माणूसकीचे स्वतंत्र अस्तित्वही नाकारले गेले. 'जिवंत सावली', 'स्त्री', 'देवदासी', 'अश्रू आईचेच का ?' या कवितांतून स्त्री प्रतिमा व्यक्त होताना दिसून येते.

आदिवासी व्यथा, वेदनांची समाजव्यवस्था बदलण्याचीवेळ आली आहे, असे वाहरु सोनवण्च्या कवितेतून स्पष्टपणे दिसून येते.

उषाकिरण आत्राम यांच्या कवितेतील आदिवासी स्त्रीयांचे चित्रण -

उषाकिरण आत्राम यांची लेखणीच्या तलवारी हा कविता संग्रह आहे. यास नामवंत लेखिका मराठी विषयात एम.ए. असून शासकीय राजपत्रित अधिकारी आहेत. गोंडी, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांची आणखीन तीन पुस्तके प्रकाशित आहेत. आदिवासींच्या जीवनाचा वेध घेऊन त्यांनी कला व लोक साहित्य यांच्या अध्ययन संशोधनात उभी हयात वेचली आहे. आणि या लेखणीच्या तलवारी या कवितासंग्रहातून वेदनेचे विश्व टिपते. स्त्रीयांच्या अत्याचार, दु:ख, दारिद्रय, पीडा, वेदना, अन्याय, शोषण विरोधात एल्गार पुकारते.

समाज जागृती आणि स्त्री जागृतीसाठी सज्ज अशी लेखिका आहे. याचे विस्तारीतपणे लेखन शोध निबंधात सादर केले आहे. या दोन कविंच्या काव्यलेखनाची वैशिष्टये. आणि तुलनात्मक अभ्यास प्रस्तुतच्या शोध निबंधातून सविस्तर पणे केलेला आहे. सदरील शोधनिबंध लेखनासाठी पुरक संदर्भग्रंथांचा आधार घेतलेला आहे. व शेवटी निष्कर्ष नोंदविण्यात आले.

●●●

# आदिवासी स्त्री आणि डाकीण प्रथा

**डॉ. शिवदास हमंद**
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, बसमत, जि. हिंगोली.

आदिवासी स्त्री - अशिक्षित, धैर्यवान, स्वावलंबी, किमान गरजांमध्ये आनंदी राहणारी, शारीरिक श्रमाची कामे करणारी आहे. तरीपण आदिवासींच्या पुरूष-प्रधान संस्कृतीत तीचा सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे. हे हजारो आदिवासी स्त्रियांना 'डाकीण' समजून छळल्यावरून स्पष्ट होते.

आदिवासी गावात कोणत्याही दु:खद घटनेमागे आदिवासी स्त्रीचा हात असल्याचे गृहित धरले जाते. काही जमातीमध्ये तिला चेटकीण, तर कुठे भुताळी, तर कुठे 'डाकीण' किंवा डायन असे संबोधले जाते. भारतातील आदिवासी बहुल राज्यात डाकीणीचा प्रश्न चिंताजनक आहे. बिहार आणि पश्चिम बंगालच्या डोंगराळ भागात, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, आंध्रप्रदेश व महाराष्ट्रात अनेक स्त्रियांना 'डाकीण' म्हणून ठार मारले गेले. भारतीय जनवादी महिला संघटनेच्या